# नियमित दरखास्त क्र. २४४/२०२० मधील निशाण ११ वरील आदेश

१. दरखास्तदार - मूळ वादी यांनी हा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश २६, नियम ९ अन्वये दावा मिळकतीची मोजणी करुन हद्दी निश्चित होऊन मिळणेसाठी व त्याबाबत अहवाल व नकाशा सादर करणेसाठी उप अधीक्षक, भूमि अभिलेख, खानापूर-विटा यांची कोर्ट कमिशनर म्हणून नियुक्ती होऊन मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. जाबदार यांना या अर्जाच्या नोटीसीची बजावणी होऊन देखील त्यांनी या अर्जास म्हणणे दाखल केलेले नाही.

३. अभिलेखातील कागदपत्रे पाहिली. दरखास्तदार तर्फे विधीज्ञ श्री.ए.के.कुलई यांचा युक्तीवाद ऐकला. जाबदार यांना नोटीसीची बजावणी होऊन देखील ते या कामी गैरहजर राहत असल्याने त्यांचे तर्फे युक्तीवाद नाही.

४. दरखास्तदार यांचे अर्जातील कथनांप्रमाणे जाबदार हे दावा मिळकतीतील त्यांचे शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करीत आहेत. त्यामुळे, दरखास्तदार यांना दावा मिळकतीची मोजणी करुन हद्दी खुणा निश्चित करुन तारेचे कंपाऊड करणेचे आहे. त्याकरीता दावा मिळकतीची उप-अधीक्षक, भूमि अभिलेख, खानापूर-विटा यांचे मार्फत मोजणी होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक व जरुरीचे आहे. सबब, दावा मिळकतीची मोजणी होऊन हद्द निश्चित करणेसाठी उप-अधीक्षक, भूमि अभिलेख, खानापूर-विटा यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक होऊन मिळावी, अशी विनंती दरखास्तदार यांनी केलेली आहे.

५. अभिलेखातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता दरखास्तदार - मूळ वादी यांनी ही दरखास्त नियमित दिवाणी मुकदमा क्र.२६५/२००२ मधील दि.१५.०७.२००६ रोजीचे हुकूमनाम्याची अंमलबजावणी होऊन मिळणेसाठी दाखल केली आहे. या हुकूमनाम्याने जे.डी. - मूळ प्रतिवादी यांचे विरुध्द त्यांनी दावा मिळकत कसबे विटा, ता. खानापूर, जि. सांगली येथील रि.स.नं. ७६५/३ब/३, क्षेत्र हेक्टर ०.५.१ आर, आकार रु.०.३१ पै. पैकी ५ आणे ४ पै हिश्याचे मिळकतीतील वादी यांचे कब्जेवहिवाटीस हरकत, अडथळा होईल असे कोणतेही कृत्य करु नये,

अशी निरंतर ताकीद झाली आहे. दरखास्तदार यांचे कथनांप्रमाणे जे.डी. हे दावा मिळकतीतील त्यांचे कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करीत आहेत. त्यामुळे, त्यांना दावा मिळकतीची मोजणी करुन हद्दी खुणा निश्चित करुन तारेचे कंपाऊड करणेचे आहे. त्याकरीता दरखास्तदार यांनी उप-अधीक्षक, भूमि अभिलेख, खानापूर-विटा यांची कोर्ट कमिशनर म्हणून नियुक्ती व्हावी, अशी मागणी केली आहे. जे.डी. यांनी दरखास्तदार यांचे या अर्जास हरकत घेतलेली नाही. दरखास्तदार तर्फे विधीज्ञ यांनी या कामी दाखल केलेल्या Gurram Anantha Reddy Vs Katla Sayanna, Civil Revision Petition No. 2982/2014, decided on 30.03.2015 या न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता हुकूमनाम्याची अंमलबजावणी करणा-या न्यायालयाला दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश २६, नियम ९ व नियम १८-अ अन्वये दरखास्तीचे कामी हुकूमनाम्याची योग्य पध्दतीने अंमलबजावणी होऊन हुकूमनामा धारकास अंतिमतः न्याय मिळण्यासाठी वाद मिळकतीचे स्थान निश्चित करणे बाबत कोर्ट कमिशनर यांची नियुक्ती करता येते, असे न्यायतत्व रुढ असल्याचे दिसून येते. या प्रकरणी मूळ हुकूमनामा हा निरंतर ताकिदीकरीता असला तरी जे.डी.-मूळ प्रतिवादी यांचेकडून होत असलेली हरकत व अडथळा टाळणेसाठी दरखास्तदार यांना दावा मिळकतीच्या हद्दी निश्चिती करुन हद्दीप्रमाणे तारेचे कंपाऊड करावयाचे आहे. दरखास्तदार यांनी केलेली ही मागणी पाहता त्यांचे मागणीप्रमाणे दावा मिळकतीच्या हद्दी निश्चित होऊन हद्दीप्रमाणे कंपाऊड झालेस जे.डी.-मूळ प्रतिवादी यांचे कडून होणारा हरकत अडथळा कायमपणे दूर होणार आहे. तसे झालेस, उभय पक्षकारांमधील वाद अंतिमतः संपुष्टात येणार आहे. त्यामुळे, वर नमूद न्यायतत्वाचा विचार करता दरखास्तदार यांचे मागणीप्रमाणे दावा मिळकतीची मोजणी करुन हद्द निश्चिती करणेसाठी उप-अधीक्षक, भूमि अभिलेख, खानापूर-विटा यांची कोर्ट कमिशनर म्हणून नियुक्ती करणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक व जरुरीचे आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे-

## अंतिम आदेश

**१.** दरखास्तदार यांचा निशाण ११ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

**२.** दावा मिळकत कसबे विटा, ता.खानापूर, जि.सांगली येथील रि.स.नं.७६५/३ब/३, सध्याचा सर्व्हे नं. ७६५/३अ/४, क्षेत्र हे.०.५.१, आकार रु.०.३१ पै पैकी ५ आणे ४ पै हिश्याचे क्षेत्राची हुकूमनाम्यामध्ये मिळकतीचे वर्णनामध्ये नमूद केलेल्या चतुःसिमानुसार मोजणी करुन हद्द निश्चित करणेसाठी व तसा नकाशासहीत स्पष्ट अहवाल सादर करणेसाठी उप-अधीक्षक, भूमि अभिलेख, खानापूर-विटा यांची कोर्ट कमिशनर म्हणून नियुक्ती करणेत येत आहे.

**३.** कोर्ट कमिशनचा होणारा संपूर्ण खर्च दरखास्तदार यांनी करणेचा आहे.

**४.** दरखास्तदार यांनी त्याप्रमाणे मोजणीचा होणारा खर्च उप-अधीक्षक, भूमि अभिलेख, खानापूर-विटा यांचे कार्यालयात त्वरित जमा करणेचा आहे.

**५.** उप-अधीक्षक, भूमि अभिलेख, खानापूर-विटा यांनी नियमांप्रमाणे दावा मिळकतीचे मोजणीचे काम पूर्ण करुन पुढील नेमली तारीख १८ डिसेंबर, २०२१ रोजी अगर तत्पूर्वी अहवाल व नकाशा सादर करावा.

**६.** कोर्ट कमिशनर उप-अधीक्षक, भूमि अभिलेख, खानापूर-विटा यांना त्वरित कमिशनपत्र पाठविणेत यावे. -

Sd/-

**दिनांक १२/११/२०२१** **(डी.एम.हिंग्लजकर)**

**ठिकाण विटा** **३रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर विटा**

**ता.खानापूर, जि.सांगली**

Case No : RD No 244 of 2020
I affirm that the contents of this pdf file Judgment are same words as per original Judgment,
Name of the Typist :D.R.Kamble
Court Name: 3rd Jt.Civil & Criminal Court, Vita, Dist-Sangli
Date of decision : 12/11/2021
Judgment signed by P.O.on : 12/11/2021
Judgment uploaded on : 13/11/2021